**ठळक बातम्या**

- अनिवासी भारतीय देशाच्या विकास आणि आधुनिकीकरणाचे अविभाज्य भाग असल्याचं लोकसभेचे सभापती ओम बिरला यांचं प्रतिपादन
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात भारताची हवाई वाहतूक सेवा जगात तिसऱ्या क्रमांकावर पोहोचल्याचं नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचं प्रतिपादन
- पुरीच्या जगन्नाथ मंदिरातल्या खजिन्याचे दरवाजे उघडले
- अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्यावरच्या हल्ल्याचा प्रधानमंत्री मोदी यांच्यासह जगभरातून निषेध
- विम्बल्डन टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत पुरुष एकेरीच्या विजेतेपदासाठी नोव्हाक जोकोविच आणि कार्लोस अल्कराज यांच्यात अंतिम लढत सुरू

**आणि**

- पाचव्या आणि अखेरच्या टी-ट्वेंटी सामन्यात भारताचा झिम्बाव्वेवर ४२ धावांनी विजय, मालिकाही ४-१ अशी जिंकली

**<><><><><>**

भारताबाहेर वास्तव्य करणारे अनिवासी भारतीय देशाच्या विकास आणि आधुनिकीकरणाचे अविभाज्य भाग असल्याचं प्रतिपादन लोकसभेचे सभापती ओम बिरला यांनी केलं आहे. रशियात मॉस्को इथं ते भारतीय समुदायाला संबोधित करत होते. रशियानिवासी भारतीयांनी मायदेशाच्या राष्ट्रउभारणीत दिलेल्या योगदानाचा त्यांनी गौरव केला. रशिया- भारत संबंध परस्पर विश्वास आणि आदरभावने वर आधारित असल्याचं ते म्हणाले. ब्रिक्स देशांच्या संसदीय मंचाच्या १०व्या

बैठकीसाठी भारतीय संसदेचं प्रतिनिधी मंडळ ओम बिरला यांच्या नेतृत्वाखाली रशियाला गेलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या गेल्या १० वर्षांच्या कार्यकाळात भारतातल्या हवाई वाहतूक क्षेत्रानं मोठी प्रगती केली असून, ही वाहतूकसेवा जागतिक पातळीवर तिसऱ्या स्थानावर पोहोचली आहे, असं केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात बोलताना सांगितलं. पुण्याच्या लोहगाव विमानतळावर नव्यानं उभारण्यात आलेलं टर्मिनल आज मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवाशांच्या सेवेसाठी खुलं करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. देशात नवीन ४६९ हवाई मार्ग सुरू झाले असून दिल्ली, बंगळुरु आणि अयोध्या विमानतळावर नवीन टर्मिनल उभी राहिली आहेत, प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावा अशीच ही कामगिरी आहे, असं ते म्हणाले. आगामी काळात देशभरात आणखी २० ते २५ नवीन विमानतळांची उभारणी केली जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. नव्या टर्मिनलवरून विमान प्रवास करणाऱ्या पहिल्या प्रवाशाला यावेळी मोहोळ यांच्या हस्ते बोर्डिंग पास देण्यात आला.

<><><><><>

केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयाने पाकिटबंद वस्तूंसाठीच्या २०११ च्या मापन पद्धती नियमांमध्ये सुधारणा प्रस्तावित केल्या आहेत. या नियमांअंतर्गत पाकिटबंद उत्पादनांविषयी वापराच्या कालावधीची मर्यादा आणि इतर तपशील जाहीर करण्यापासून, किरकोळ विक्रीसाठी नसलेल्या २५ किलो, तसेच २५ लिटरपेक्षा जास्त प्रमाण असलेल्या पाकिटबंद वस्तूंना वगळले होते. मात्र यापेक्षाही जास्त वजनाची पाकिटबंद उत्पादने किरकोळ बाजारातही विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे

आढळल्याने नियमांमध्ये बदल करण्याचा निर्णय घेतल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. त्यामुळे सुधारित नियमांनुसार केवळ औद्योगिक ग्राहक किंवा संस्थात्मक ग्राहकांसाठी असलेल्या पाकिटबंद वस्तू - उत्पादने वगळता इतर सर्व पाकिटबंद वस्तू - उत्पादनांना तपशील जाहीर करणे बंधनकारक केले जाणार आहे. नागरिकांनी या सुधारणांबाबत येत्या २९ जुलै २०२४ पर्यंत, म्हणजे १५ दिवसांच्या आत आपापले अभिप्राय कळवावेत असं आवाहनही मंत्रालयानं केलं आहे.

**<><><><><>**

देशात माल वाहतुकीसाठी शून्य कार्बन उत्सर्जन ट्रक वाहनांच्या अवलंबित्वाला चालना देण्याच्या उद्देशानं निती आयोगानं गिअर शिफ्ट चॅलेंज या हॅकेथॉन उपक्रमाची घोषणा केली आहे. इलेक्ट्रिक ट्रकच्या वापरामुळे आपल्याला कार्बन उत्सर्जनात घट साध्य करण्याची, हवेच्या गुणवत्तेत सुधारणा घडवून आणण्याची आणि ऊर्जा सुरक्षेत वृद्धी साध्य करत मोठं परिवर्तन घडवून आणण्याची संधी मिळेल असं निती आयोगानं म्हटलं आहे. त्यादृष्टीनंच अशा ट्रक वाहनांचा वापर करण्याच्या प्रयत्नांना गती देण्याकरता, तसंच अशा ट्रकच्या वापरातल्या समस्या आणि त्यावरच्या संशोधनपूर्ण उपाययोजना सुचवणारं व्यावसायिक प्रारुप तयार करता यावं या उद्देशानं हे हॅकेथॉन राबवलं जाईल.

**<><><><><>**

केंद्रीय विधि आणि न्याय मंत्रालयाच्या वतीनं 'हमारा संविधान हमारा सन्मान' या उपक्रमाच्या प्रादेशिक स्तरावरील दुसरा कार्यक्रम येत्या १६ जुलै २०२४ रोजी उत्तर प्रदेशातल्या प्रयागराज इथं होणार आहे. भारतीय राज्यघटना आणि भारताचा प्रजासत्ताक देश म्हणून घोषित केल्याच्या घटनेच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त

हा कार्यक्रम होईल. यावेळी 'हमारा संविधान हमारा सन्मान' या पोर्टलचा प्रारंभही केला जाईल, तसंच मायगव्ह या डिजीटल व्यासपीठावरून जानेवारी ते एप्रिल या कालावधीत झालेल्या संविधान विषयक प्रश्नमंजुषा, पंच प्रण रंगोत्सव, आणि पंच प्रण अनुभव या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ देखील होईल. या कार्यक्रमालाच धरून समांतरपणे ‘सबको न्याय, हर घर न्याय’, ‘नव भारत नव संकल्प’ आणि ‘विधी जागृती अभियान’ यांसारखे उपक्रमही राबवले जाणार आहेत.

नागरिकांमध्ये राज्यघटनेविषयीची समज वाढावी, कायदेशीर हक्कांविषयीची जागरूकता रुजावी या हेतूनं याच वर्षी जानेवारी महिन्यात या अभियानाची सुरूवात केली गेली होती.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज मध्यप्रदेशातल्या इंदोर शहरात एक पेड माँ के नाम या अभियानाचा शुभारंभ केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या अभियानाची घोषणा केल्यावर जनतेनं त्या आवाहनाला प्रतिसाद दिला असल्याचं शहा यावेळी म्हणाले. इंदोरची ओळख स्वच्छ शहराबरोबर हरित शहर अशी होत असल्याचं त्यांनी सांगितलं. इंदोरनं एका दिवसात ११ लाख रोपांची लागवड करून जागतिक विक्रम केला आहे. दरम्यान, गृहमंत्री अमित शाह यांनी आज अन्य एका कार्यक्रमात मध्यप्रदेशमधल्या सर्व ५५ जिल्ह्यांतल्या प्रधानमंत्री उत्कृष्टता महाविद्यालयांचं उद्घाटन केलं.

**<><><><><>**

शेअर बाजारातल्या गुंतवणुकीतून जास्त परतावा मिळवून देण्याचं आमिष दाखवत, शेकडो जणांची फसवणूक केल्याप्रकरणी मुंबई गुन्हे शाखेच्या मालमत्ता विभागानं आशिष शहा या व्यक्तीला मध्यप्रदेशातून अटक केली आहे. पोलिसांनी

त्याच्याकडून १ किलो ९०० ग्रॅम सोनं आणि २५ लाखांची रोकडही जप्त केली. शहा याच्या चौकशीत त्यानं आत्तापर्यंत जवळपास ४०० ते ५०० जणांची फसवणूक केल्याचं निष्पन्न झालं अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

**<><><><><>**

मणिपूरमध्ये जिरीबाम जिल्ह्यात दहशतवाद्यांनी आज सकाळी केलेल्या हल्ल्यात केंद्रीय राखीव दलाचा एक जवान ठार तर दोन पोलिस जखमी झाले. सुरक्षादलांनी या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर दिलं. मुख्यमंत्री एन बिरेन सिंग यांनी या हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे.

**<><><><><>**

ओदिशातल्या भगवान जगन्नाथांचं रत्नभांडार उघडण्याची प्रक्रिया आज दुपारी सुरू झाली. ही संपूर्ण प्रक्रिया सरकारने आखून दिलेल्या मानकांनुसार पार पडली असून तिचं व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आलं आहे. रत्नभांडारात दुर्मीळ दागिने, रत्नं, सोनं यांचा समावेश आहे. हा मौल्यवान ऐवज ठेवलेल्या पेट्या कडेकोट सुरक्षा व्यवस्था असलेल्या खोलीत तात्पुरत्या स्वरुपात ठेवल्या आहेत. या ऐवजाची मोजदाद करण्यात येईल. हे रत्नभांडार यापूर्वी १९८५ मध्ये उघडण्यात आलं होतं, तर यातल्या मौल्यवान वस्तूंची मोजदाद शेवटची १९७८ मध्ये झाली होती.

**<><><><><>**

डीडी रोबोकॉन २०२४ या स्पर्धेत निरमा विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाच्या चमूनं विजेतेपद पटकावलं आहे. दिल्ली इथल्या त्यागराज मैदानावर झालेल्या या कार्यक्रमाचं आयोजन प्रसारभारती आणि भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, नवी दिल्ली

यांच्या संयुक्तपणे केलं होतं. विजेता चमू व्हिएतनाम इथं होणाऱ्या जागतिक एशिया पॅसिफिक ब्रॉडकास्टिंग यूनियन रोबोकॉन स्पर्धेत सहभागी होणार आहे.

<><><><><>

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्यावर झालेल्या हल्ल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. प्रधानमंत्र्यांनी या घटनेचा निषेध केला असून राजकारणात आणि लोकशाहीत हिंसेला कोणतंही स्थान नाही असं समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. ट्रंप यांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा होवो, अशी प्रार्थना करत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. या हल्ल्यातल्या मृतांचे कुटुंबीय, जखमी व्यक्ती आणि अमेरिकी नागरिकांच्या दुःखात भारत सहभागी आहे, असंही त्यांनी सांगितलं.

अमेरिकेत पेनिसिल्व्हेनिया इथं एका प्रचार सभेदरम्यान अचानक झालेल्या हल्ल्यात डोनाल्ड ट्रंप जखमी झाले तर एक बंदूकधारी आणि प्रेक्षकांमधला एक जण मारले गेले. हल्ला झाल्यानंतर ट्रंप व्यासपीठावर कोसळले असता  सिक्रेट सर्व्हिस एजंट्सनी त्यांना सावरलं. सिक्रेट सर्विसच्या जवानांनी दाखवलेल्या तत्परतेबद्दल ट्रम्प यांनी त्यांचे आभार मानले आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनी या हल्ल्याचा निषेध केला असून  ट्रम्प सुरक्षित असल्याबद्दल समाधान व्यक्त केलं आहे. लोकशाहीत राजकीय हिंसाचाराला अजिबात स्थान असता कामा नये अशा शब्दात  अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी निषेध व्यक्त केला आहे. अमेरिकेच्या उप राष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस यांनी ही घटना धक्कादायक असल्याचं म्हटलं आहे.

ट्रंप यांच्यावर झालेल्या हल्ल्याबद्दल जगभरातून निषेध व्यक्त होत आहे. हा राजकीय हिंसाचार असल्याचं संयुक्त राष्ट्राचे महासचिव अँटोनिओ गुटेरस यांनी

म्हटलं आहे, तर  ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टारमर आणि कॅनडाचे प्रधानमंत्री जस्टीन ट्रुडो यांनीही तीव्र निषेध केला आहे. याशिवाय ब्राझील, जपान, कॅनडा यांच्यासह अनेक देशांच्या प्रमुखांनी या हल्ल्याचा निषेध केला आहे.

**<><><><><>**

नेपाळच्या प्रधानमंत्री पदी तिसऱ्यांदा के. पी. शर्मा ओली यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या आधीचे प्रधानमंत्री पुष्प कमल दहल प्रचंड यांनी शुक्रवारी हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्ये बहुमत गमावल्यानंतर नवं सरकार स्थापन करण्यात आलं.

**<><><><><>**

पाचव्या आणि अखेरच्या टी-ट्वेंटी सामन्यात भारतानं झिम्बाव्वेचा ४२ धावांनी पराभव करत पाच सामन्यांची मालिकाही ४-१ अशी जिंकली. या सामन्यात झिम्बाव्वेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. त्यानंतर भारतानं संजू सॅमसन याच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर निर्धारीत २० षटकांत ६ बाद १६७ धावा केल्या. विजयासाठी १६८ धावांचा पाठलाग करताना, झिम्बाव्वेचा डाव १८ षटकं आणि ४ चेंडुतच १२५ धावांत आटोपला. भारताच्या वतीनं मुकेश कुमार यानं सर्वाधिक ४ गडी बाद केले.

**<><><><><>**

विम्बल्डन टेनिस अजिंक्यपद स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या विजेतेपदासाठी नोव्हाक जोकोविच आणि कार्लोस अल्कराज यांच्यात अंतिम लढत सुरू आहे. मागच्या वेळी अल्कराजनं पहिलं तर जोकोविचनं सात वेळा या स्पर्धेचं अजिंक्यपद पटकावलं आहे.

नवी दिल्ली येथील साहित्य अकादमी आणि अटल बिहारी वाजपेयी हिंदी विश्वविद्यालय भोपाळ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय कोरकू भाषा साहित्य संमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. १५ आणि १६ जुलै रोजी भोपाळ इथं हे संमेलन होईल. अमरावती जिल्ह्यातले ज्येष्ठ साहित्यिक प्राध्यापक डॉक्टर काशिनाथ बराटे हे या साहित्य संमेलनात सहभागी होऊन कोरकू वाचिक महाकाव्याचा इतिहास या विषयावर सविस्तर विवेचन करणार आहेत.

//<><><><><>//